पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **०४/०८/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०४/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.चिंचवडे सचिन बाजीराव
६. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
७. मा.जावेद रमजान शेख
८. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे – सहाय्यक आयुक्त (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) प्रभाग क्र.३९, ४० व ४१ मधील मंडपाच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.११ यमुनानगर मधील ठाकरे ग्राऊंड मधील स्केटींग रींगचे बाजूने लोखंडी जाळी बसविणे या कामाच्या स्वरुपात बदल करणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे मध्ये काळभैरवनाथ मंदिर येथे बहुदद्येशिय इमारत बांधणेचे काम न करता या कामातून नविन प्रभाग क्र.२१ मधील इतरत्र स्थापत्य विषयक कामे करणेबाबत - मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.६ मोशी, इङ्ळगाव-केळगाव पुलासाठी गट क्र.२०६ ते गट नं.२३१ मधील १८ मी.डी.पी.रस्ता तयार करणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२१/०७/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०४/०८/२०१७ विभाग – प्रशासन
सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४९१/२०१७, दि.१९/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'प्रशासन अधिकारी' अभिनामाची पदे र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. जाहिरात क्र.९३/२०१३ नुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/१४९२/१३, दि.२०/११/२०१३ अन्वये श्री.खोत संदिप दादासाहेब यांना खुला (भ.ज.(क)) आणि श्री.बहुरे सिताराम देवचंद यांना वि.जा.(अ) या प्रवर्गातून सरळसेवा प्रवेशाने प्रशासन अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या नियुक्ती आदेशामध्ये आपण जर दि.०१/११/२००५ पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत दाखल झाला असाल तर आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर रुजू झाल्यापासून तीन महिन्याच्या कालावधीत, संबंधित शासकीय/निमाशासकीय कार्यालयाने आपले सेवानिवृत्ती वेतन अंशदान (Pension Contribution) व रजा वेतन अंशदान (Leave Salary Contribution) ची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू राहील. तसेच संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडे जमा असणारी भविष्य निर्वाह निधीची व्याजासह रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील. अन्यथा आपणांस दि.३१ ऑक्टोंबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' (Defined Contribution Pension system) लागू राहील', याप्रमाणे अट नमूद करण्यात आलेली आहे.

श्री.खोत संदिप दादासाहेब हे दि.११/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.खोत संदिप हे दि.१४/१०/२००५ पासून जिल्हा परिषद अहमदनगर या आस्थापनेवर ग्रामसेवक पदावर कार्यरत होते. श्री.बहुरे सिताराम देवचंद हे दि.१७/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.बहुरे सिताराम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या आस्थापनेवर दि.२२/०६/२००५ पासून टायपिस्ट या पदावर कार्यरत होते. संबंधित कार्यालयामध्ये सदरच्या अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (नियम) १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू होती. उक्त अधिका-यांनी प्रशासन अधिकारी पदाकरीता अर्ज करताना दि.१२/०१/२००७ च्या शासन परिपत्रकामधील अटी व शर्तीची पूर्तता केलेली आहे.

नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार संबंधितांचे पूर्वीच्या कार्यालयाकडे रजा वेतन अंशदान व सेवानिवृत्ती वेतन अंशदान रकमेची मागणी केली असता, श्री.खोत यांच्यासंदर्भात अहमदनगर जिल्हा परिषद यांनी जिल्हापरिषद सेवेतून एखादा कर्मचारी महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिकेकडे सेवेत हजर झाल्यास संबंधित संस्थांना सेवानिवृत्ती वेतन अंशदान व रजा वेतन अंशदान वर्ग करण्यासंदर्भात **नियम अस्तित्वात असल्याचे दिसून येत नसलेबाबत** मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रा.पं.) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जा.क्र.साप्रवि२/ग्रामपंचायत८/६८/१६, दि.२७/०४/२०१६ अन्वये कळविले आहे. तर श्री. बहुरे यांच्याबाबत महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाकडील दि.२१/०७/१९८३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील विद्यापीठे तसेच संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर वर्गाला निवृत्तीवेतन अनुदान योजना दि.०१/१०/१९८२ पासून लागू करण्यात आली आहे. श्री. बहुरे यांची नेमणूक दि.०१/१०/१९८२ नंतर झाली असल्यामुळे सेवानिवृत्ती अंशदान भरण्याचा प्रश्न उद्भवत नसलेबाबत मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी दि.१८/०२/२०१६ चे पत्रान्वये कळविले आहे.त्यामुळे श्री.खोत व श्री.बहुरे यांनी दि.२०/०८/२०१६ च्या अर्जान्वये नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार अट क्र. ६ ची पूर्तता न झाल्याने सदरची रक्कम स्वत: भरण्यास तयार असल्याबाबत कळविले असून पूर्वीची सेवा सलग धरुन महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, रजा वेतनाच्या लाभासाठी विचार करण्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडील क्र.मुलेप/१/कावि/४८६/१७, दि.१९/०१/२०१७ अन्वये प्रकरणी श्री.खोत व श्री. बहुरे, प्रशा. अधिकारी यांचे **नियुक्ती आदेश क्र.प्रशा/१/कावि/ १४९२/१३, दि.२०/११/२०१३ मधील अट क्र.६ शिथिल करावी लागेल आणि शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी यांची मनपा सेवेत येणेपूर्वीची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजनासाठी धरणेबाबत मनपाचे धोरण निश्चित नसलेने याबाबत मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागेल याप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.**

सबब, श्री.खोत संदिप व श्री.बहुरे सिताराम यांच्या मागील सेवेला संरक्षण देणेप्रकरणी **नियुक्ती आदेश दि.२०/११/२०१३ मधील अट क्र. ६ शिथिल करणे,** श्री.खोत यांची जिल्हा परिषद अहमदनगर या आस्थापनेवर दि.१४/१०/२००५ ते दि.१०/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली सेवा त्याचप्रमाणे श्री.बहुरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या आस्थापनेवर दि. २२/०६/२००५ ते दि.१६/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली **सेवा पिंपरी चिंचवड महापालिकेकडे सलग सेवा धरणे, उक्त कालावधीकरीता सदरच्या कार्यालयाकडे जमा असलेल्या सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि रजा वेतनाच्या रकमा लेखा विभागामार्फत निश्चित करुन संबंधित अधिका-यांमार्फत भरुन घेणे आणि सदरच्या रकमा भरुन घेतल्यानंतर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणे या बाबीस मान्यता** देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०४/०८/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सचिन चिंचवडे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव –

भारतीय सैन्यदलाच्या आयुधांचे व रणगाडे इत्यादींचे प्रदर्शन एच.ए.मैदान, पिंपरी येथे भरवण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार एच.ए.मैदानावर मंडप उभारणी व इतर अनुषंगीक कामे करण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत प्रभाग क्र.३९, ४०, ४१ अंतर्गत सन २०१७ सार्वजनिक महापालिका निवडणूकीसाठी मंडप विषयक व अनुषंगिक कामे करण्याचे निविदा क्र.२६/८०/२०१६-१७ र.रु.११,९५,९३८/- चे काम चालू आहे. सदर चालू कामातूनच सदरचे काम करण्यात यावे असे वाटते. त्यानुसार सदरचे काम करणेस र.रु.१५,००,०००/- इतकी रक्कम कमी पडत असल्याने वाढीव कामासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. मंडपाचे काम निविदा क्र.२६/८०/२०१६-१७ या कामातून करणेस व सदर कामाच्या सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.३०,००,०००/- ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०४/०८/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सचिन चिंचवडे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.११ यमुनानगर मधील ठाकरे ग्राऊंड मधील स्केटींग रींगचे बाजूने लोखंडी जाळी बसविणे या कामाच्या स्वरुपात बदल करणेस मान्यता देणेस तसेच येत आहे. सदर कामाची निविदा र.रु.४६,२१,८४९/- इतकी असून निविदा नोटीस क्र.४४/३७/२०१६-१७ चे काम मे.झुंजार कन्स्ट्रक्शन या ठेकेदारास देणेत आलेले आहे. फेब्रुवारी २०१७ पासून नगरसदस्यांकडे नविन प्रभाग क्र.१३ मधील नागरिकांकडून फुटपाथवर कलर पेव्हिंग ब्लॉक बसविणेसाठी वारंवार मागणी होत आहे. तथापि स्थापत्य विभाग फ क्षेत्रीय कार्यालयाकडे अशा स्वरुपाचे काम करणेसाठी दुसरे काम उपलब्ध नसल्यामुळे नगरसदस्यांच्या मागणीनुसार सदर निविदेमधील कामाच्या ठेकेदाराकडून नविन प्रभाग क्र.१३ मध्ये फुटपाथवर कलर पेव्हिंग ब्लॉक बसविणेची कामे, जुने पेव्हिंग ब्लॉक काढून दुरुस्ती करणेची कामे, सिल्व्हर ज्युबिली ग्राऊंड येथे लॉन टेनिस ग्राऊंडला चेनलिंक फेन्सींग बसविणेचे काम तसेच से.२१ येथील त्रिवेणीनगर चौकातील सभामंडपाच्या जागेस गेट बसविणे व इतर आवश्यक ती कामे केलेली आहेत. सदर केलेल्या कामास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच याच कामातून भविष्यात नविन प्रभाग क्र.१३ निगडी यमुनानगर मध्ये फुटपाथवर कलर पेव्हींग ब्लॉक बसविणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०४/०८/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सचिन चिंचवडे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.सचिन चिंचवडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे मध्ये काळभैरवनाथ मंदिर येथे बहुउद्येशिय इमारत बांधणे (निविदा क्र.७४/०४/२०१६-१७, र.रु.३८,३७,५३२/- (अक्षरी र.रु.अडतीस लाख सदतीस हजार पाचशे बत्तीस फक्त) या कामाचा आदेश मे.एस.एस.साठे यांना दि.११/०१/२०१७ रोजी देण्यात आला आहे. सदर कामांतर्गत काळभैरवनाथ मंदिराच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार होते परंतु सदर काळभैरवनाथ मंदिराची केवळ दुरुस्ती न करता ते पाडून नव्याने मंदिर बांधण्यात यावे अशी तेथील नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे तेथे दुरुस्ती कामे केल्यास सदरचा खर्च वाया जाणार आहे. तरी विषयांकित कामांतर्गत दुरुस्तीचे काम न करता या कामातून नविन प्रभाग क्र.२१ मधील इतरत्र स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०४/०८/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६ मोशी, इंद्रायणगाव-केळगाव पुलासाठी गट नं.२०६ ते गट नं.२३१ मधील १८ मी. डि.पी.रस्ता तयार करणे (निविदा क्र.३७/२३-२०१६-१७) कामांतर्गत मोशी आळंदी रस्ता ते केळगाव पुलापर्यंतचा रस्ता प्रस्तावित होता. तथापि इंद्रायणीनदीवर शासनामार्फत बांधणेत आलेला पुल अर्धवट असल्याने सदर रस्त्याचा सद्य:स्थितीत वापर होणार नाही. त्यामुळे सदरचे काम करण्याऐवजी मोशी-आळंदी रस्ता (गट क्र.५० ते गट क्र.७७) पर्यंतचा १८ मी.डि.पी. रस्त्याचे काम जागा बदल करुन करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०४५/२०१७
दिनांक : ०५/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.